**Azadi Express Flagged Off by Hon. Chief Minister Eknath Shinde on the occasion of Azadi Ka Amrit Mahotsav.**

**August 15, 2022:** To mark the occasion of Azadi Ka Amrit Mahotsav, Shri. Eknath Shinde, Hon. Chief Minister, Maharashtra State, Virtually flagged off Azadi Express in the presence of Mr. Bhushan Gagrani, Additional Chief Secretary, Govt of Maharashtra, Shri S.V.R. Srinivas, Metropolitan Commissioner, MMRDA and other Senior officials.

This Azadi Express is a special initiative by MMRDA and MMMOCL to celebrate Azadi Ka Amrit Mahotsav. This is special Metro train will be joining in the fleet of Metro Line 2A and 7.

The Images of The Great Maratha Emperor Chhatrapati Shivaji Maharaj, Historical Castles of Maharashtra and many other Heritage Monuments were displayed on the Azadi Express.

“Har Ghar Tiranga campaign has created a wave of patriotism across the country. Every citizen is participating in this celebration of Azadi Ka Amrit Mahotsav. On this occasion I Salute the freedom fighters who sacrificed their lives for the freedom of India. I admire the work of shri. S.V.R. Srinivas and MMRDA's team for this initiative," said Hon. Chief Minister Shri Eknath Shinde.

Shri. Bhushan Gagrani, Additional Chief Secretary, Govt of Maharashtra said that, "Passengers should preserve the sanctity of Azadi Express, which reflects the Memory of the Struggle Indian Freedom Fight and also showcases the beauty of Maharashtra.".

"The Azadi Express will now add 18 trips taking the total no of trips to 172. This will help reduce the time interval between trips from 12 minutes to 10 minutes helping passengers save their precious time," said Shri. S.V.R. Srinivas, Hon.Metropolitan Commissioner, MMRDA.

**मा.मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदेंनी दाखवला आझादी एक्सप्रेसला हिरवा कंदील. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजराकरण्यासाठी एमएमआरडीए चा नवा उपक्रम.**

**दिनांक ऑगस्ट 15, 2022:** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारण आणि महा मुंबई मेट्रोमार्फत घरोघरी तिरंगा या संकल्पेनवर आधारीत तिरंगा रंगात सजवलेल्या आझादी एक्सप्रेसला श्री एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते तसेच श्री भूषण गगराणी भा.प्र. से., मा. अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन आणि श्री एस.व्ही.आर. श्रीनिवास भा.प्र. से., मा. महानगर आयुक्त एमएमआरडीए, यांच्या उपस्थितीत दुरदृश्यप्रणाली द्वारे हिरावा कंदिल दाखवून ही आझादी एक्सप्रेस प्रवाशांच्या सेवेत दाखल करण्यात आली आहे.

सध्या कार्यरत असलेल्या मेट्रोच्या ताफ्यात रुजू होणाऱ्या नव्या मेट्रोचे नाव आझादी एक्सप्रेस आहे. या आझादी एक्सप्रेस च्या दर्शनी भागांवर महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्रातले गड किल्ले आणि इतर ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अनेक स्मारकांचे चित्र प्रदर्शित करण्यात आले आहेत.

"घरोघरी तिरंगा या अभियानातुन देशभरात देशभक्तीची लाट उसळली आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव या कार्यक्रमात प्रत्येक नागरीक सहभागी झालेला पहायला मिळतोय. स्वातंत्र्यासाठी आहुती देणाऱ्या स्वातंत्र्यविरांना विनम्र अभिवादन. आझादी एक्सप्रेसच्या माध्यमातून राबविलेल्या या उपक्रमाबद्दल मी श्रीनिवास आणि एमएमआरडीए च्या टीमचं अभिनंदन करतो," असे महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे म्हणाले.

या प्रसंगी "भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृतीला उजाळा देणाऱ्या तसेच महाराष्ट्रा चे सौंदर्य दर्शवणाऱ्या आझादी एक्सप्रेसचे पावित्र्य प्रवाशांनी स्वच्छता राखून जपावे" असे श्री भूषण गगराणी भा.प्र.से., मा. अप्पर मुख्य सचिव महाराष्ट्र शासन म्हणाले.

"मेट्रो च्या ताफ्यात रुजू झालेल्या या आझादी एक्सप्रेसमुळे उद्यापासुन 18 सेवांची वाढ होणार आहे. आझादी एक्सप्रेसमुळे 154 असलेल्या मेट्रोसेवा आता 172 इतक्या होतील. त्यामुळे दर 12 मिनिटाला धावणारी मेट्रो आता दर 10 मिनिटांनी धावेल. ज्यामुळे निश्चितच प्रवाशांचा वेळेत अजून बचत होईल," अशी माहिती श्री.एस.व्ही. आर श्रीनिवास भा.प्र. से., मा. महानगर आयुक्त एमएमआरडीए, यांनी दिली.


महाराष्ट्र शासन
महा मुंबई मेट्रो
Maha Mumbai Metro
(१५ ऑगस्ट, २०२२)
मा.ना.श्री.एकनाथ शिंदे,
तथा अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.
यांच्याकडून सर्वांना


महाराष्ट्र शासन
एम एम आर डी ए
MMRDA
आज़ादी का अमृत महोत्सव
महा मुंबई मेट्रो
Maha Mumbai Metro
भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त
Azadi Ka Amrit Mahotsav | Har Ghar Tiranga




बाहेर
Exit
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | घरो घरी तिरंगा
01